प्रकरण : तिसरे

# मनोहर तल्हार यांची कविता

प्रकरण : तिसरे

# मनोहर तल्हार यांची कविता

३.१ मनोहर तल्हार यांच्या कवितांचे वर्गीकरण

३.२ सामाजिक कविता

३.३ प्रेमविषयक कविता

३.४ स्त्री-जीवनाचे दुःख मांडणाऱ्या कविता

३.५ उपहासगर्भ कविता

३.६ अभंग

३.७ संदर्भ

प्रकरण : तिसरे

# मनोहर तल्हार यांची कविता

**म**नज़ोहर तल्हार हे मराठी रसिकांना कथाकार व कादंबरीकार म्हणून परिचित आहेत; पण कवी म्हणून कमी रसिकांना माहिती आहेत, असे म्हणता येणार नाही. कारण त्यांच्या कवितेने सामाजिक भान जपत, महाराष्ट्रातील उच्च वाङ्मयीन अभिरुचीसंपन्न नियतकालिकांतून स्थान प्राप्त केलेले आहे. इ.स. १९५३ ते १९९४ या कालखंडात कवी ग्रेस, मधुकर केचे, सुरेश भट यांच्या कवितांसोबत मराठी भाषेतील 'सुषमा', 'युगवाणी', 'अस्मितादर्श', 'प्रतिष्ठान' अशा मासिकांतून आणि 'लोकमत'सारख्या दैनिकांमधून त्या प्रकाशित झाल्या आहेत. प्रदीर्घ कालखंडात अंतःकरणपूर्वक लिहिलेल्या कविता, निवडक बावन्न कवितांचा समावेश 'श्वेतांबरी' या कवितासंग्रहात आहे. कथा-कादंबरीकार आणि 'माणूस'कारच्या आवरणाखाली मधली काही वर्षे 'कवी' मनोहर तल्हार झाकलेले दिसतात. यात सत्यता वाटत नसली तरी 'श्वेतांबरी' कवितासंग्रहाच्या निर्मितीशी एका मोठ्या कालपटात कवीच्या अनुभवविश्वाचे धागे कसे गुंतले आहेत, याचा त्यांच्या कविता प्रत्यय देऊ पाहतात. कुठेही नवोदितपणाचा शिक्का जाणवत नाही. एखाद्या सराईत हाताने एखादी कलाकृती निर्माण करावी तशी नितळ पारदर्शक कविता 'श्वेतांबरी'च्या रूपाने तल्हारांनी दिली आहे. जीवनातील गुंतागुंत उलगडताना अनुभवाला येणारी विपरीतता आणि सुखसौंदर्याचा मृत्यू घडविणारी वास्तवाची क्रूरता यांचा वेध कवीने या कवितासंग्रहातून घेतलेला आहे.

'श्वेतांबरी' या कवितासंग्रहातील कवितांमध्ये अनेक पैलूंचे दर्शन घडते. सामाजिक जाण, विद्रोह, निसर्गचित्रण, 'मी-तू'चा प्रत्यय, व्यवस्थेविरुद्धची चीड, प्रतीकात्मता हे सर्व गुणविशेष त्यांच्या कवितेत जाणवतात. या संग्रहातील कवितांच्या संदर्भात असे म्हणता येते, की कवी फारच भावनात्मक पातळीवर कवितेत जगताना दिसतात. स्वतःपेक्षा निसर्गदत्त प्रतिमेवर कवीची अतूट श्रद्धा आहे असे सतत जाणवत राहते.

मनोहर तल्हार 'श्वेतांबरी' कवितासंग्रहाच्या मनोगतात म्हणतात, ''१९५३ ते १९९४ या एक्केचाळीस वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडात प्रसिद्ध झालेल्या एकूण शंभरसव्वाशे कवितांतून ही बावन्न कवितांच्या निवडीतून साकारलेला 'श्वेतांबरी' हा माझा पहिलाच कवितासंग्रह होय.''[१] त्यांच्या वेगवेगळ्या ठिकाणी शंभर-सव्वाशे कविता प्रकाशित झाल्या असून, त्यातून बावन्न कविता या कवितासंग्रहाद्वारे आपल्यासमोर त्यांच्या गुण-वैशिष्ट्यानिशी उपस्थित राहतात. 'रस्ता', 'मी नास्तिक नाही', 'श्वेतांबरी' यांसारख्या दीर्घ कविता आहेत; तशाच 'नागीण', 'स्थितप्रज्ञ', 'सरण' यांसारख्या छोटेखानी कविताही आहेत. प्रेमावरील निष्ठा प्रकट करणाऱ्या चार-चार किंवा आठ-आठ ओळींच्या प्रेमकविता व अभंगरचनाही आहेत. या संग्रहातील स्त्री-मनाची वेगवेगळी भावावस्था व्यक्त करणाऱ्या रम्यतेबरोबर उत्कटताही कवितेमध्ये जाणवते. श्रीधर शनवारे 'श्वेतांबर' कवितासंग्रहाच्या प्रस्तावनेत म्हणतात, ''तल्हारांच्या कवितेने दुःखाचा वसा घेतलेला आहे. सुखवाद तल्हारांना मानवत नाही. आशावाद, युगुत्सुवृत्ती या गोष्टी त्यांच्या लेखणीच्या अंगी लागत नाहीत.

''जीव आत, वर हात । खाली दिवसाचे पाळू ।
लपू कुठे? कुठे पळू? आता लागे पीठ गळू ।।''[२]

या ओळीतून तल्हारांच्या कवितेचे वेगळेपण लक्षात येते.

मनोहर तल्हार यांच्या कवितेचे एका मोठ्या कालपटाशी अनुभवविश्वाचे धागे गुंतल्याचा प्रत्यय येतो. जीवनाची गुंतागुंत उलगडताना अनुभवाला येणारी विपरीतता आणि सुख-सौंदर्याचा मृत्यू घडविणारी वास्तवाची क्रूरता यांचा वेध कवीने 'श्वेतांबरी' कवितासंग्रहात घेतलेला आहे. मानवी नातेसंबंधांना जखमी करणाऱ्या प्रत्येक कृतीचा निषेध करताना ही कविता कणखर झालेली दिसते. त्याचबरोबर प्रेमाचे अलवारपण टिपून घेणारी उत्कटताही मनोहर तल्हार यांच्या कवितेत आढळून येते. अभंग, मुक्तछंद आणि एक आंतरिक लय या कवितेच्या वेधकतेच्या मुळाशी आहे. त्यांची कविता आशयगर्भ असून, मानवी संवेदनांचे पापुद्रे ती अलगद उलगडते. काही कविता स्वच्छंदवादी स्वरूपाच्या आहेत. त्याचबरोबर सामाजिक जाणीव व्यक्त करताना ती कमालीची टोकदार बनते. भूत, भविष्य, वर्तमान या सर्व काळांचा सूचक वापर तत्त्ववादी शैलीत तल्हारांनी केला आहे.

मनोहर तल्हार यांच्या कवितांचे आशयानुरूप वर्गीकरण पुढीलप्रमाणे करता येईल.

३.१.१) सामाजिक कविता

३.१.२) प्रेमविषयक कविता

३.१.३) स्त्री-जीवनाचे दुःख मांडणाऱ्या कविता

३.१.४) उपहासगर्भ कविता

३.१.५) अभंग

**३.१.१) सामाजिक कविता**

मनोहर तल्हार यांनी सामाजिक जाणिवेतून कवितेच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक कार्यावर प्रकाश टाकणारी 'सूर्य' आणि 'तू' या दोन कविता लिहिल्या आहे. त्यासोबतच राष्ट्रमाता इंदिरा गांधींच्या भारतीय नेतृत्वावर व त्यांच्या ध्येयावर दृष्टिक्षेप टाकणारी 'प्रियदर्शिनी इंदिरे' ही कविता लिहिल्याचे दिसते. त्याचबरोबर 'आग', 'अस्तित्ववादी', 'रस्ता' या काही सामाजिक आशयाच्या कविता आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरील प्रगाढ श्रद्धा असलेल्या जनसमुदायाने बौद्ध धर्माची घेतलेली दीक्षा आणि सहा डिसेंबर एकोणीसशे छप्पन्नला झालेले महापरिनिर्वाण, या दरम्यान बाबासाहेबांनी सांगितलेल्या विचारांशी एकरूप झालेल्या समाजाचे वास्तवचित्रण लेखकाने केलेले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवरील मनोहर तल्हार यांची श्रद्धा किती प्रगाढ आहे याचे उदाहरण म्हणजे 'श्वेतांबरी' कवितासंग्रहातील पहिलीच कविता होय.

''ज्या दिशेला तू पूर्व म्हटले
ती दिशाच पूर्व झाली.''[३]

वर्षानुवर्षे अंधारात सापडलेल्या समाजाला दिशा दाखवली आणि त्यांच्या आयुष्याला प्रकाश देण्याचे फार मोठे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले आहे. नंदादीपासारखे स्वतः जळत राहून, समाजाला प्रकाश देण्याचे उत्तुंग असे कार्य त्यांनी केलेले आहे. कवितेच्या शेवटच्या चरणात समाज जागृत होऊ लागल्याचे वर्णन करताना कवी म्हणतात-

''प्रत्येक दिशेला सूर्य पेटला होता

प्रत्येक दिशेला सूर्य पटला होता

तो दिवस होता

सहा डिसेंबर एकोणवीसशे छपन्न ॥''[४]

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महत्त्व भारतीय जनतेला त्यांच्या मृत्यूनंतरच समजले. वर्षानुवर्षे अंधारात दिशाहीन झालेल्या समाजाला माणूस म्हणून जगण्याचे हक्क देण्याचे घटनात्मक कार्य त्यांनी केले आहे. वर्षानुवर्षे परंपरेने नाकारलेल्या समाजाला कायदेशीर हक्क प्राप्त करून दिले. मनोहर तल्हार यांनी कवितेमध्ये जे वर्णन केलेले आहे, त्यामध्ये कुठेही बटबटीतपणा जाणवत नाही. सहा डिसेंबर एकोणीसशे छप्पन्न या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिवसाचे अलौकिक वर्णन कवीने केलेले आहे. पूर्वेला पूर्व म्हणण्याची अपूर्वाई नष्ट झाली. तेव्हा प्रत्येक दिशेला सूर्य पेटला होता. इतके अभूतपूर्व वर्णन नेमक्या शब्दांत मनोहर तल्हार यांनी केल्याचे दिसते.

माणूस निर्विकार असतो. तो एखाद्या गोष्टीची तोंडभरून स्तुती करतो; पण ती वस्तू बनवणाऱ्या माणसाला वा व्यक्तीला किती त्रास झाला असेल त्याची साधी जाणीवही इतरांना होऊ देत नाही. 'स्थितप्रज्ञ' या कवितेत असाच सूर दिसून येतो.

''वेरूळच्या लेण्या

अनामिक असंख्य कलावंतांनी कोरलेल्या...

''हे देखणे शिल्प दगडातून साकार झालेले

आणि मी

सजीव असूनही निर्जीव दगडासारखा.''[५]

ही कविता शेवटी माणूस निर्विकार आहे हेच सांगत नाही का? 'श्वेतांबरी'मध्ये इतर कविताही वाचनीय व चिंतनीय आहेत. या कविता त्यावेळी वैचारिक व भावनिक प्रतिक्रिया म्हणून उमटलेल्या दिसतात.

भारतीय मनोवृत्तीचे दर्शन, विकारांची झालेली वाढ, आदर्शवादाचा वध याचे मनोज्ञ चित्रण आदरसूचक भाषाशैलीत 'प्रियदर्शिनी इंदिरे' या कवितेत कवीने केले आहे. ३१ ऑक्टोबर

१९९४ रोजी माथेफिरूंनी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची गोळ्या घालून हत्या केली. या घटनेने संपूर्ण भारतावर, भारतीय जनतेवर आघात झाला. व्यथित अंतःकरणाने सर्वसामान्य माणूस अश्रू ढाळू लागला.

इंदिरा गांधींच्या हत्येने भारताला खग्रास सूर्यग्रहण लागल्यासारखे कवीला वाटते. धर्म, वंश व जातीच्या नावावर संस्कृती आणि मानवी मूल्यांचा पदोपदी ऱ्हास होत आहे. कवी म्हणतोः

''धर्मगुरूंच्या रूपात वावरणारे हे गारदी
संताचे नाव लावून कपाळावर क्रूरकर्म्याचा
रक्ताचा टिळा लावणारे.''[६]

अशा कवितांमधून कवी मनोहर तल्हार मूर्त भावानुभूतीतून वास्तवातील क्रूर व ओंगळ विसंगती व्यक्त करतात. ''तुझ्या पायावर फुलांचा सडा पडावा असे तुझे कार्य असूनही तुझ्याजवळच्या तुझ्याच लोकांकडून तू फुलासारखी चिरडली गेलीस. तुझे शरीर माशाच्या जाळ्यासारखे चाळणी झाले. या घटनेमुळे तुझ्यावर जिवापाड प्रेम करणाऱ्या समाजाच्या हृदयात स्फोट झाला.'' कवितेच्या शेवटच्या ओळीत कवी म्हणतात,

''जब तक सूरज चाँद रहेगा।
इंदिराजी तेरा नाम रहेगा॥''[७]

या कवितेच्या ओळी इंदिरा गांधींच्या हत्येच्या वेळी आकाशवाणीवरून तमाम भारतीय जनसमुदायाला ऐकवल्या जात होत्या. एकूणच या कवितेमध्ये इंदिरा गांधींची क्रूर हत्या आणि त्यांचे अजरामर व्यक्तिमत्त्व शब्दांच्या माध्यमातून उभे केलेले दिसते.

### ३.१.२) प्रेमविषयक कविता :

मनोहर तल्हार यांच्या कवितेतील 'मी' अनेक पातळ्यांवर प्रातिनिधिक स्वरूपात आलेला जाणवतो. त्यांच्या 'मी आणि तू'च्या काही कविता भावगर्भ अनुभूतीचा प्रत्यय देऊन. त्यातून जीवनाचे तत्त्वज्ञान सहजसुंदर शैलीत सांगून जातात. मानवी मनात असलेल्या हा प्रेमाचे खेळ हळुवार, ओला आशय घेऊन शब्दरूपाने कागदावर उतरते. तेव्हा त्याला असलेली भरजरी

किनार उजळून निघते. ‘निरोप’, ‘शिल्प’, ‘अस्तित्व’, ‘हिमवेडा’, ‘वादळवारा’, ‘तुझेपण’, ‘रेघा’, ‘स्थितप्रज्ञ’, ‘अहिल्या तू’, ‘विषकन्या’, ‘डोळे’, ‘नागीण’, ‘बहाणा’, ‘उल्का’, ‘माती’, ‘प्रतीक्षा’, ‘साद’, ‘ज्योत’, ‘बुजगावणे’, ‘आपण’, ‘कोरडा’, ‘श्वेतांबरी’ या कवितांमधून मनोहर तल्हार यांनी ‘मी-तू’चे माध्यम अधिक व्यापक बनविले आहे. यातून ते जीवनाचे सहज साधे सिद्धांत मांडत जातात. त्यामुळे त्यांच्या कवितांना एक नवाच अर्थ प्राप्त झाला आहे. कवीने अर्थामध्ये जडपणा किंवा शाब्दिक बोजडपणा कुठेच येऊ दिला नाही. त्यामुळे ‘श्वेतांबरी’च्या रूपाने दिसणारे तल्हार आपल्या आतील खाचखळगे सहज पार करतात आणि काव्यरसिकांना एक वेगळ्याच अनुभवविश्वात घेऊन जाऊन, भान विसरायला भाग पाडतात. ‘इवलेसे पान’ या कवितेमध्ये मनामध्ये उठलेल्या वादळाची मीमांसा करताना कवी नेमक्या शब्दांत भावार्थ पकडतात.

“आता संपूर्ण शरीरच जंगल झाले आहे।
आणि मन वादळ झाले आहे॥”[८]

मोडून पडलेला असूनही एखाद्या दीपस्तंभासारखा तग धरून उभा असलेला माणूस हा इवलंस पान गच्च पकडून ठेवीत आहे. असे कवी सांगू इच्छितो.

‘अस्तित्व’ ही आशयाने ओतप्रोत असलेली कविता वादळातही जगण्याचे भान देते. स्वतःचे मीपण वाऱ्यावर सोडून देऊन, उपेक्षितांना नव्या जगण्याचे संदर्भ पुरवीत राहते. आपल्या अनामिक ‘प्रियेला’ शरीरात पेटलेला वणवा विझविण्याची विनंती करणारी ही कविता पंचतत्त्वांचा खेळ आणि अस्तित्वाच्या गुणांना सतत खुणावत असते. गंगाजलाच्या एका थेंबासाठी कायम तळमळत राहते.

मनोहर तल्हार यांची कविता छंदबद्ध आहे. जीवनाचं यथार्थ चित्रण करतानाच ती कधी प्रगतिवादी होते हे कळतच नाही. अनुभवाच्या पातळीवर तिच्यामधून व्यक्त होणारे सूक्ष्म आशय मानवी स्वभावातील वेगवेगळ्या वृत्ती-प्रवृत्तींचे आणि विकारांचे दर्शन घडवितात.

“गळ्यातल्या गळ्यात हा जीव लागला थर्थरू।
दळायचे काय आत जाते लागले घर्घरू॥”[९]

ही वैफल्यग्रस्तता कधी कधी जिवघेणी वाटू लागते. आयुष्याच्या पाऊलवाटेवरील चटके

कवीने शब्दबद्ध केलेले आहेत. त्यामुळे या कवितेत एक विलक्षण ओजस्वीपणा आला आहे.

अंधारून आले, की भीतीने किनारा सुनसान होतो. हिशेबी माणसे सावधपणे प्रकाशदिशेने वळतात; पण वेड्या माणसांचे सगळेच वेगळे असते. शरीराभोवतीचा गडद अंधार, त्यांच्या मनावर प्रतिभेचा फुलोरा फुलवतो. साऱ्या संवेदना हलक्या होतात... जणू मुक्तीचा क्षण खुणावत असतो आणि अशावेळी कोसळणाऱ्या पावसात चिंब भिजलेली एक 'श्वेतांबरी' मनोहर तल्हार यांच्यामधील कवीला साद घालत असते.

### ३.१.३ स्त्री-जीवनाचे दुःख मांडणाऱ्या कविता

'श्वेतांबरी' कवितासंग्रहामध्ये मुख्यतः स्त्री-जीवनाचे विविध भाव वेगवेगळ्या स्वरूपात उमलून येतात. 'माती', 'ज्योत', 'थेंब', 'हिमवेडा', 'वादळवारा', 'इवलेसे पान', 'वाऱ्यावरली मी', 'सरण', 'साद', 'अस्तित्व' अशा अनेक कवितांतून स्त्रीअंतरातील दुःख मनोहर तल्हार यांची कविता व्यक्त करते.

''नदीकाठी मी ही । उभी उभा जन्म
डोळ्याकाठी थेंब । वांझोटा हा ।।''[१०]

अशी ही स्त्री-मनाची भावावस्था कवितेतून दिसून येते. जीवन जगत असताना आलेले चांगले-वाईट अनुभव व त्यातून जन्मलेले प्रेमपत्र 'इवलेसे पान' या कवितेमधून व्यक्त होते. संकटकाळी वाचवून जीवनाला आधार देऊन, तिचा परिपूर्ण उपभोग घेतला आणि पुन्हा निष्ठूरपणे वाऱ्यावर सोडून दिलेल्या दुबळ्या स्त्रीचे जीवन या कवितेत व्यक्त झालेले आहे.

''माझ्यापासून स्वतःला अलग करून
तू परतलास... निष्ठूरपणे!
तुझ्यासाठी विल्हल होऊन आकांत करणाऱ्या मला
एकदाही मागे वळून न पाहता तू निघून गेलास
मला कायमचे वाऱ्यावर सोडून.''[११]

आजही स्त्रियांकडे उपभोगाचे साधन म्हणून पाहिले जाते. तरुणपणी स्त्रीचा उपभोग घ्यावा आणि तारुण्य ओसरल्यानंतर टाकाऊ वस्तूप्रमाणे वाऱ्यावर सोडून द्यावे. समाजाचा अर्धा भाग

असूनही प्राचीन काळापासून आजपर्यंत हाच दृष्टिकोन पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेचा दिसून येत आहे. कवीने स्त्री-मनाची घालमेल नेमक्या शब्दांत टिपलेली आहे.

'श्वेतांबरी' कवितासंग्रहामध्ये स्त्री-वर्गाचे दुःख, स्त्री-मनाच्या विविध भावावस्था अनुभवण्याचा वसा घेतलेली कविता असा या कवितासंग्रहाचा गुण-विशेष सांगता येईल.

''तुझ्या सावलीत आता । विझो द्यावी माझी वाती ।

माझ्या मरणाला मिळो । तुझ्या चरणाची माती ॥''[१२]

अशी प्रेमावरची अविचल निष्ठा 'श्वेतांबरी'तून व्यक्त होते. या कवितासंग्रहामध्ये स्त्री-जीवनाचे अनेक अवस्थांतील दुःख व्यक्त झालेले आहे. स्त्री-मनाच्या विविध पातळ्यांवरून वेगवेगळ्या भावावस्था अनुभवण्याची ही तांबे कुलोत्पन्न तऱ्हा हे त्यांच्या कवितेतील एक आगळेपण जाणवते. 'श्वेतांबरी' कवितासंग्रहामध्ये स्त्री-वर्गाचे दुःख आणि स्त्री-मनाच्या विविध भावावस्थांचे पैलू व्यक्त होताना दिसतात. स्त्री दुःखाची असलेली जाणीव, स्त्रीमनाच्या नेमक्या दुःखऱ्या नसेवर बोट ठेवल्याचे कवितेत दिसून येते.

### ३.१.४) उपहासगर्भ कविता

मनोहर तल्हार यांनी मोजक्याच; परंतु समाजव्यवस्थेच्या मर्मावर बोट ठेवणाऱ्या उपहासगर्भ कविता लिहिल्या आहेत. 'आग' ही कविता उपरोधिका, उपहासगर्भ कविता होय. त्यामधील चित्रण विनोदप्रचुर असले, तरी ते मानवी मनाला कमालीचे अस्वस्थ करणारे आहे.

'आग' कवितेमध्ये माणसाच्या पायाखाली जखमी झालेल्या झुरळाचा विषय आहे. मानवाच्या पायाने जखमी झालेल्या झुरळाला न्याय मिळालाच पाहिजे. या भावनेने मुंग्यांचा मोर्चा निघतो, पण जखमी झालेले झुरळ जेव्हा मरण पावते तेव्हा न्यायाच्या घोषणा करणाऱ्या मुंग्या झुरळ खाण्यासाठी तुटून पडतात. शेताची राखण करणाऱ्या कुंपणानेच शेत खावे तसाच अनुभव येथे येतो. मर्ढेकरांनी व्यक्त केलेली 'मी एक मुंगी' या कवितेतील मानवी क्षुद्रत्वाची जाणीव कवी व्यक्त करतो. स्वार्थासाठी मनुष्य प्रसंगी किती क्षुद्र होत असतो. याचा अनुभव सार्वत्रिक आहे.

'रस्ता' ही कविता म्हणजे एक पथनाट्यच होय. या रस्त्यावर अव्याहत- सूर्य उगवल्यापासून

मध्यरात्रीपर्यंत- घडणाऱ्या घटनांची रस्त्याशी निगडित असलेली चित्रे मनोहर तल्हार यांनी निरीक्षिली असून, त्यांचे कवितेत चित्रण केलेले आहे. कवितेतला 'तो' या रस्त्यावर घडणाऱ्या सर्व घटनांचा साक्षीदार असतो.

'रस्ता' या कवितेतील याच सत्याचा आभास नाटकातही घडत असतो. समग्र कवितेचा 'नाद' या ओळीने पकडलेला आहे. वाङ्मयप्रकार या दृष्टीने 'रस्ता' हा वाङ्मयप्रकार कवितेच्या बाजूने असला तरी त्याला ललित बंधाचे रस्त्यावरील घटना व अनुभव बोलके झाले आहेत.

या कविता वाचल्यानंतर कवीच्या सामाजिक जाणिवांचा अंदाज वाचकाला सहज येतो. मनोहर तल्हार यांच्या एकूणच साहित्यसंभाराला कुठेतरी माणसाच्या मनातील माणुसकीचा स्पर्श आहे. मग त्याला कविताही अपवाद ठरू शकत नाही.

'इवलेसे पान', 'पंचतत्त्व', 'मोर्चा', 'मी नास्तिक नाही' व 'फिनिक्स' या कवितांमधून जीवनातील जळजळीत अनुभव, मानवी मनाचे न उलगडणारे विविध पदर, जीवनातील स्वार्थलोलुपता, मनाचे धागे उसवणाऱ्या असंख्य आठवणी या साऱ्यांमुळे तल्हारांची कविता जेवढी उत्कटता येते तेवढीच ती कणखरही बनलेली दिसते.

### ३.१.५) अभंग

मधुकर केचे, श्रीधर शनवारे, ना. घ. देशपांडे आदी वैदर्भीय कवींनी अभंग या काव्यप्रकारामध्ये मोलाची भर घातली आहे. कवी केचे यांच्या समकालीन असणारे मनोहर तल्हार यांचे अभंग हे तेवढ्याच मोलाचे वाटतात. जीवनाचे सूक्ष्म निरीक्षण, व्यापक अनुभवाचा परिपाक त्यांच्या अभंगरचनांमधून पदोपदी जाणवत राहतो.

''कळेना कलेची। वेळ की अवेळ
अवेळीच कळ ॥ भाळी नाही.''[१३]

अशी विलक्षण यथार्थ शब्दकळा कवितेतून व्यक्त होताना जाणवते. 'घाव', 'बंगले', 'माज' इत्यादी अभंगांमधून त्यांनी सामाजिक दंभावर प्रचंड प्रहार केला आहे.

''साधुनिया संधी
संधिसाधू व्हावे

मंदिर बांधावे

टोलेजंग,

मंदिर पाहोनि

भुलती सगळे

आपले बगळे

ओळखावे.''[१४]

अशी व्यथा व्यक्त होत असताना जनसामान्यांच्या श्रद्धेवर स्वार्थाची पोळी भाजण्याच्या प्रवृत्तीवर अभंग या काव्यप्रकारातून तल्हारांनी ताशेरे ओढले आहेत. जगाचा विचार करताना 'सुख अज्ञानाचे असे झाले वांझ, दुःखालाही माज आज', अशी प्रतिक्रिया या कवितेतून उमटत राहते. जीवनातील व्यथा, वेदना, निसर्ग, आकार, विकार, सचेतन अशा वेगवेगळ्या प्रवृत्तींवर प्रतिक्रिया नोंदविलेल्या दिसतात.

**सारांश**

'बुढीचं खाटलं', 'तोलरेघ', 'कॅन्सल', 'निःसंग' हे कथासंग्रह वाचताना एक गोष्ट लक्षात येते, की कथा-कादंबरीमधून जो भाव व्यक्त होतो तोच भाव कवितेतूनही व्यक्त होत असल्याचा प्रत्यय येतो. काव्यसंग्रहाला 'साजेसे' असे मुखपृष्ठही दिलेले आहे.

मनोहर तल्हार म्हणतात, ''शेवटी तोडक्या मोडक्या मला समजलेल्या शब्दांत मी लिहिलं.''[१५] मनोहर तल्हार यांच्या 'श्वेतांबरी' कवितासंग्रहाबद्दल रसात्मक लिहिणे थांबवण्यापूर्वी त्यांच्याच एक कवितेच्या ओळी येथे सांगता येतीलः

''आता आनंदी आनंद

नाही जखम फुंकर

जुन्या स्मृतींच्या स्वतःला

घ्यावे गाडून मातीत.''[१६]

मनोहर तल्हार यांची कविता वाचकमनाला भूल पाडते. 'श्वेतांबरी' कथासंग्रहातील कविता संग्रहित रूपात आली असून, तिच्या मोठ्या कालपटाशी कवीच्या अनुभवविश्वाचे धागे

कसे गुंफले आहेत, याचा प्रत्यय ती देऊ पाहते.

एकूणच त्यांच्या कवितेमध्ये सामाजिक जीवनाची गुंतागुंत उलगडताना अनुभवाला येणारी विपरीतता आणि सुखसौंदर्याचा मृत्यू घडविणारी वास्तवाची क्रूरता यांचा वेध घेतलेला दिसून येतो. डॉ. अरुणा ढेरे म्हणतात, ''मानवी नातेसंबंधाना जखमी करणाऱ्या प्रत्येक हेतूचा आणि कृतीचा निषेध करताना ही कविता कणखर झालेली दिसते आणि प्रेमाचे अलवारपण टिपून घेताना उत्कटही.''[१७]

मानवी जीवनातील व्यथा, वेदना, निसर्ग, आकार, विकार, सचेतन, सत्प्रवृत्ती- आसक्त प्रवृत्ती इत्यादी दोन्ही बाजूंवर कवीने आपली प्रतिक्रिया नोंदविली आहे. त्यामुळे मनोहर तल्हार यांची कविता कोणत्या एका बाजूकडे झुकलेली नाही किंवा ती एकांगी झाली नाही; तर त्यांची कविता सर्वस्पर्शी अशी आहे. तर फुलासारखी कोमल, प्रसंगी, वज्रासारखी कठोर वृत्तीची आहे. काळ आणि वादळाला चिमटीत पकडण्याची शक्ती तल्हारांच्या कवितेत जाणवते. दीनदुबळ्यांसाठी विव्हल होऊन, त्यांना ओटीपोटीत घेऊन माया करणारी ही कविता 'मी'पणाचा प्रातिनिधिक ध्यास धरणारी आहे. आपल्या अस्तित्वाच्या गौरवशाली खुणा सोडत मृत्यूशी सिंहासारखी झुंजणारी बलदायिनी 'श्वेतांबरी'तील कविता पंचतत्त्वांची आराधना करीत राहते. सर्वसामान्यांच्या दुःखाला वाचा फोडणारी ही कविता विकारांचा, कुप्रवृत्तींचा, दंभाचा निषेध करणारी असल्याचे जाणवते.

'श्वेतांबरी' या कवितासंग्रहातील कवितांचा सूर काहीसा दुःखाचा, निराशेचा किंवा कटू वास्तवाच्या दर्शनाने भावविव्हल आहे. श्रीधर शनवारे म्हणतात, ''एखाद्या अंधाऱ्या बोगद्यातून प्रवास करावा तसे या कविता वाचताना वाटते, की एक प्रकारची उदासी, खिन्नता, विमनस्कता वाचकांच्या मनाला घेरून घेते.''[१८] 'माज'सारखी कविता याच अनुभवाचे प्रातिनिधिकपणे नेतृत्व करते.

''व्यथेने कथिली
ऋचा जाणिवेची
सुखाची जननी खुडूकली

सुख अज्ञानाचे
असे झाले वांझ
दुःखालाही माज
आला आज.''[१९]

प्रा. कृष्णा चौधरी म्हणतात, ''मनोहर तल्हार यांची कविता ही साधी, सरळ व विविधरंगी सदाफुलीच्या रंगाप्रमाणे आनंद देणारी आहे. त्यात भावानुभूती व कृत्रिम तिर्यक प्रतिमांचा अंगीकार ती सहसा करीत नाही. तिच्यातील भावानुभूती एखाद्या वाहणाऱ्या झऱ्यासारखी सतत वाहत राहते.''[२०]

मनोहर तल्हार यांच्या कवितेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची कविता 'मी-मग्न' कविता नाही. त्यांच्या कवितेतून त्यांच्या वैयक्तिक भाव-भावना, खासगी जीवन सहसा व्यक्त होत नाही. म्हणूनच त्यांची कविता स्वनिरपेक्षतेचा अनुभव देते. त्यांच्या कवितेतून 'स्वजीवना'च्या चित्रणापेक्षा समाजजीवनाचे चित्रण आलेले पाहावयास मिळते. त्यांच्या बहुसंख्य कविता स्त्रीमनाचा हुंकार व्यक्त करणाऱ्या आहेत. 'थेंब', 'माती', 'इवलेसे पान' यांसारख्या कवितांतून स्त्रीमनात ठसठसणारी वेदना अत्यंत प्रत्ययकारीपणे व्यक्त झालेली आहे.

सामाजिकता, स्त्रीमनाच्या वेदना आणि मानवी जीवनातील दुःखाचा वेध घेणाऱ्या त्यांच्या कविता आहेत, असे म्हणता येते. त्यांच्या बऱ्याच कविता आकाराने लहान असल्या; तरी त्यांतील आशय, भाव, विचार मानवी जीवनाच्या संदर्भात मोठा आहे, असे म्हणता येते.

❋❋❋

## ३.७ संदर्भ


१. मनोहर तल्हार : ‘श्वेतांबरी’चे मनोगत, रीता प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती १९९५.

२. मनोहर तल्हार : ‘श्वेतांबरी’ प्रस्तावना (श्रीधर शनवारे) तत्रैव.

३. तत्रैव, पृ. १

४. तत्रैव, पृ. १

५. तत्रैव, ‘स्थितप्रज्ञ’, पृ. २२

६. तत्रैव, ‘प्रियदर्शिनी इंदिरे’, पृ. ८

७. तत्रैव, पृ. ८

८. तत्रैव, ‘इवलेसे पान’, पृ. ४

९. तत्रैव, ‘पंचतत्त्व’, पृ. ६

१०. तत्रैव ‘थेंब’, पृ. ८

११. तत्रैव, ‘वाऱ्यावरली मी’, पृ. ५

१२. तत्रैव, ‘माती’, पृ. ४८

१३. तत्रैव, ‘थेंब’, पृ. १२

१४. तत्रैव, ‘बगळे’, पृ. ५२

१५. तत्रैव, मनोगत

१६. तत्रैव, ‘कांच’, पृ. २५

१७. मनोहर तल्हार : ‘श्वेतांबरी’ मलपृष्ठ, डॉ. अरुणा ढेरे, तत्रैव

१८. तत्रैव, प्रस्तावना - श्रीधर शनवारे

१९. तत्रैव, ‘माज’, पृ. ५३

२०. प्रा. कृष्णा चौधरी : ‘तरुण भारत’ दिनांक २९ ऑक्टोबर १९९६


❀❀❀